सामना

## ठाण्यात 'महिला आयोग आपल्या दारी'

# १७४ तक्रारींवर ऑन द स्पॉट फैसला

**अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी घेतली जनसुनावणी**

ठाणे, दि. २३ (प्रतिनिधी) - कामावर असताना सहकाऱ्यांकडून छळ होतो.. नवरा मारहाण करतो.. मालमत्तेमध्ये अधिकार दिला जात नाही अशा विविध प्रकारच्या १७४ तक्रारी आज 'महिला आयोग आपल्या दारी'अंतर्गत जनसुनावणीमध्ये करण्यात आल्या. या तक्रारींचा तातडीने निपटारा करण्याचे आदेश आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत. या सर्व तक्रारींवर ऑन द स्पॉट फैसला झाल्याने महिलांनी समाधान व्यक्त केले आहे.



ठाण्यात आज झालेल्या जनसुनावणीमध्ये जिल्ह्याच्या विविध भागांतून वैवाहिक, कौटुंबिक, सामाजिक, मालमत्ता आदी क्षेत्रातील तक्रारी दाखल झाल्या. त्यात सामाजिक समस्या १८, नऊ मालमत्ताविषयक तर पाच कामाच्या ठिकाणी होणाऱ्या त्रासाबाबतच्या होत्या. त्याशिवाय इतर विषयांशी संबंधित २६ तक्रारी दाखल झाल्या. महिलांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी पाच पॅनलची नियुक्ती करण्यात आली होती.

### शाळेपासूनच समुपदेशन करा

या सुनावणीच्या वेळीस पोलीस, प्रशासन, विधी सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक यांचीदेखील हजेरी होती. या सर्वांच्या उपस्थितीत महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी सर्व तक्रारी सहानुभूतीने ऐकून घेतल्या व संबंधितांना योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देशही दिले. राज्यात मुली गायब होण्याचे वाढलेले प्रमाण ही चिंतेची बाब असून असे प्रकार रोखण्यासाठी जिल्हा परिषदेने त्यांच्या शाळांपासूनच मोहीम सुरू करावी, असे निर्देशही चाकणकर यांनी दिले. यासंदर्भात विद्यार्थी व पालकांचे समुपदेशन करण्यास त्यांनी सांगितले.

Mumbai Edition
May 24, 2023 Page No. 7
Powered by : eReleGo.com

लोकमत

# आयोगाच्या अध्यक्षांवर तक्रारींचा पाऊस

## रूपाली चाकणकर : राज्यात सर्वाधिक तक्रारी ठाणे जिल्ह्यातील

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत मी २४ जिल्ह्यांचा आढावा घेतला. त्यात आतापर्यंत ठाणे जिल्ह्यातून सर्वाधिक १७४ तक्रारी प्राप्त झाल्या. यात कौटुंबिक समस्येच्या ११६, सामाजिक समस्येच्या १८, मालमत्तेसंदर्भातील नऊ, कामाच्या ठिकाणी होणाऱ्या त्रासाच्या पाच आणि इतर २६ तक्रारींचा समावेश होता, अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली. या तक्रारींवर तातडीने सुनावणी घेऊन संबंधित विभागांना त्याचे निराकरण करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.



ठाण्यात झालेल्या जनसुनावणीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर.

### जानेवारी ते एप्रिलपर्यंत अपहरणाच्या ३६ घटना

ठाणे ग्रामीणमध्ये जानेवारी ते एप्रिल २०२३ अपहरणाच्या ३६ घटना घडल्या असून त्यापैकी २७ जणींची सुटका केली आहे, तर ९ जणींचा शोध सुरू आहे. ठाणे ग्रामीणमध्ये जाने. ते एप्रिल २०२३ मध्ये १२५ बेपत्ता होण्याच्या केस दाखल असून पैकी ९४ सापडल्या असून ३१ जणींचा शोध सुरु आहे

चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी आयोगाच्या सदस्य गौरी छाब्रिया, उत्कर्षा रूपवते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, अतिरिक्त जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, अति. पोलिस आयुक्त पंजाबराव उगले, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलाश पवार, उपस्थित होते. चाकणकर म्हणाल्या की, ठाणे जिल्ह्यात १८ बालविवाह रोखले आहेत. कोविड काळात बालविवाहाची संख्या महाराष्ट्रात वाढली. रोखलेल्या बालविवाहांची कागदावरील संख्या १८ असली तरी प्रत्यक्षात ही संख्या तीनअंकी आहे. बालविवाहाची मोहीम युद्धपातळीवर रोखण्यासाठी आशा वर्कर, पोलिस पाटील, अंगणवाडी सेविका यांना सोबत घेऊन ती राबवण्याचे आदेश दिले आहे.

# 'महिला आयोग आपल्या दारी' अंतर्गत १७४ तक्रारींवर सुनावणी



सुनावणीनंतर जिल्ह्यातील पोलीस, आरोग्य, महिला व बालविकास, कामगार, शिक्षण आदी विभागांचा आढावा घेण्यात आला. महिलांच्या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधित विभागांना कार्यवाही करण्याच्या सूचनाही श्रीमती चाकणकर यांनी दिल्या.

**ठाणे:** 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमाअंतर्गत ठाणे जिल्ह्यात आज झालेल्या जनसुनावणीमध्ये जिल्ह्यातून 174 तक्रारी प्राप्त झाल्या अ[illegible] या सर्वांच्या तक्रारींवर तातडीने सुनावणी घेऊन संबंधित विभागांना त्याचे निराकरण करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याची, माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी आज येथे दिली.

महिलांच्या तक्रारींवर सुनावणी करुन त्यांना न्याय देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या महिला आयोग आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत आज ठाण्यात आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती चाकणकर यांच्या अध्यक्षतेखाली जनसुनावणी घेण्यात आली. यावेळी आयोगाच्या सदस्य गौरी छाब्रिया, उत्कर्षा रुपवते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, अतिरिक्त जिल्हाधिकारी मनीषा जायभाये, अति. पोलीस आयुक्त पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी महेंद्र गायकवाड, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलाश पवार, ठाणे महापालिका उपायुक्त श्री. गोदापुरे आदी उपस्थित होते.

आज झालेल्या जनसुनावणीमध्ये जिल्ह्यातून एकूण 174 तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये 116 तक्रारी या वैवाहिक/कौटुंबिक समस्यासंदर्भातील होत्या. तर 18 तक्रारी सामाजिक समस्येच्या, 9 तक्रारी मालमत्ता विषयक, 5 तक्रारी या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या त्रासाच्या आणि इतर विषयाच्या 26 तक्रारी दाखल झाल्या होते. या तक्रारींवर पाच पॅनेलच्या माध्यमातून जागेवरच सुनावण्या घेण्यात आल्या व संबंधित विभागांना त्यावर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती श्रीमती चाकणकर यांनी दिली. या जनसुनावणीवेळी पोलीस, प्रशासन, विधी सल्लागार, समुपदेशक, जिल्हा समन्वयक उपस्थित होते.

यावेळी श्रीमती चाकणकर म्हणाल्या की, अनेक महिलांना मुंबईतील कार्यालयात येऊन तक्रार करणे, सुनावणीसाठी प्रत्यक्ष उपस्थित राहणे आर्थिकदृष्ट्या तसेच इतर कारणामुळे शक्य होत नाही. त्यांना महिला आयोग आपल्या दारी उपक्रमाचा फायदा होत आहे. कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह, अंधश्रद्धा, माता व बालमृत्यू अशा घटना रोखणे आवश्यक आहे. यासाठी सर्व विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित येऊन हे अनुचित प्रकार रोखण्यासाठी सहकार्य करावे. महिलांची सुरक्षा, त्यांचे सक्षमीकरण या संदर्भात ठाणे जिल्ह्यात जिल्हा प्रशासन, महापालिका, महिला व बालविकास विभाग हे चांगले उपक्रम राबवित आहेत. देहविक्रय करणाऱ्या महिलांसाठी रोजगार निर्मिती, महापालिकेच्या बसमध्ये सीसीटीव्ही बसविणे, हिरकणी कक्षाची स्थापना अशा विविध उपक्रमाद्वारे जिल्ह्यात महिलांविषयक उत्कृष्ट काम सुरु आहे.

जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण कमी असले तरी अनेक ठिकाणी लपूनछपून, जन्मतारीख चुकीची दाखवून बालविवाह होत आहेत. असे प्रकार रोखण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न होणे आवश्यक असून अंगणवाडी सेविका, आशा सेविका आदींमार्फत जनजागृती करण्यात यावी. बालविवाह रोखण्यासाठी राज्य महिला आयोग विशेष प्रयत्न करत आहे. राज्यात मुलींचे गायब होण्याचे प्रमाण ही चिंतेची बाब आहे. अशा महिला व मुलींचा शोध लागला नाही, तर त्या मानवी तस्करीला बळी पडण्याची भिती आहे. त्यामुळे असे प्रकार रोखण्यासाठी वयात येणाऱ्या मुलींचे तसेच त्यांच्या पालकांचे समुपदेशन होणे आवश्यक आहे. यासाठी जिल्हा परिषदेने त्यांच्या शाळांपासून मोहिम सुरु करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

जिल्ह्यातील मनोधैर्य योजनेच्या लाभार्थ्यांच्या अर्जातील त्रुटी दूर करून त्यांना तातडीने लाभ देण्याच्या सूचना देण्यात आल्या. कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ रोखण्यासाठी शासकीय, निमशासकीय, खासगी आस्थापनामध्ये अंतर्गत महिला तक्रारी निवारण समितीची स्थापना करणे आवश्यक आहे. येत्या तीन आठवड्यात जिल्ह्यातील सर्व कार्यालयांमध्ये ही समिती प्रत्यक्षात स्थापन करण्याच्या सूचनाही श्रीमती चाकणकर यांनी यावेळी दिल्या.